

# नांगरून ठेवलेले शेत

सुषमा कृष्णा जाधव



ई साहित्य प्रतिष्ठान



# नांगरून ठेवलेलं शेत

**सुषमा कृष्णा जाधव**

सुगावा प्रकाशन, पुणे

ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com

Nangrun Thevalela Shet
**Shusma Krushna Jadhav**

नांगरून ठेवलेलं शेत
(कवितासंग्रह)

**सुषमा कृष्णा जाधव**

**प्रकाशक : प्रा. उषा वाघ**
**सुगावा प्रकाशन,** ५६२, सदाशिव पेठ, पुणे ३०.
Email : vilaswaghpune@gmail.com
फोन : ०२०-२४४७८२६३

**हक्क :** सुषमा कृष्णा जाधव

**प्रथमावृत्ती : ६ नोव्हेंबर २०१२**

**मुखपृष्ठ व आतील चित्रे :** गिरीश सहस्रबुद्धे

**अक्षरजुळणी :** शुभांगी एन्टरप्रायजेस, पुणे.

**मुद्रक :** स्वरुप मुद्रणालय, शनिवार पेठ, पुणे ३०.

**किंमत : रु. ८०/-**

sushamapoems@gmail.com
Ph. : 8652547769

ई पुस्तक निर्मिती व वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com
www.esahity.com

# प्रस्तावना

'नांगरून ठेवलेलं शेत' हा सुषमा जाधव यांचा पहिलावहिला कवितासंग्रह प्रकाशित होतो आहे. त्याबद्दल त्यांचं दिलसे अभिनंदन! पहिलटकरणीची हुरहूर, भावनांची अधीर थरथर या काव्यसंग्रहात मला जाणवली. भावली. खरं तर कवितेची समीक्षा वगैरे करण्याचं कसब माझ्याकडे नाही, हे सुरुवातीलाच सांगायला हवं. मी कुणी प्रतिथयश कवियित्री किंवा लेखिका नाही. जाणीव-नेणीवेच्या संदिग्ध उजेडात शिरत कविता कवीच्या संवेदनेला शब्दरूप देते. म्हणून कविता हा साहित्यप्रकार मला खूप आवडतो. कवितेतली लय, नाद, प्रतिमा, शब्द मनाला भुरळ पाडणारे असतात. कवितेचा जन्म कसा होतो हा सनातन प्रश्न सगळ्यांना नेहमीच सतावत असतो. याविषयीचं कुतूहल आपलं मन ताजंतवानं ठेवायला मदत करतं असं मला वाटतं. उच्च दर्जाच्या साहित्यिकापासून ते डॉक्टर, इंजीनिअर, वकील, प्राध्यापक ते कष्टकरी वर्गातले स्त्री-पुरुष, तसंच ग्रामीण भागातले शेतकरी, शेतमजूर हे सर्व स्तरातील लोक काव्यप्रकाराला आपलंसं करत असतात. आपल्या मनातल्या भाव-भावना व्यक्त करायला कवितेसारखं दुसरं सहजसुंदर सोपं माध्यम नाही, असं त्यांना वाटत असावं. अस्सल जीवनानुभव सांगणारी कविता आपल्या जगण्याच्या कक्षा रुंदावते आणि जगण्याचं बळही वाढवते.

आमचा चळवळीतला मित्र राजेंद्र बहाळकर सुषमाला घेऊन माझ्याकडे आला. सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या काहीशा अबोल स्वभावाच्या सुषमाच्या संवेदनशील कविता असणारा हा कवितासंग्रह त्यानं माझ्या हाती दिला आणि मला प्रस्तावना लिहिण्याचा प्रेमळ आग्रह केला. मित्राचा आग्रह कसा मोडणार? 'Let thousand flowers bloom' ही स्त्रीचळवळीची शिकवण आठवली आणि मी सरळ कविता वाचायला सुरुवात केली. कवितेविषयी सुषमा जे कवितेतून म्हणते ते खूप महत्त्वाचं आहे. ती म्हणते-

''कवितेच्या मूठभर ओळीत
आयुष्याचे सार सामावलेले असते.
...मला जेव्हा गरज असते खरी
तेव्हा माझ्या वेदनेचा ती श्वास होते...
...बनतो आम्ही बघा
रात्र आणि दिवसाला जोडणारा
शाश्वत दुवा!''

सुषमाच्या कवितांमधून तिचं व्यक्तित्व स्वच्छ प्रतिबिंबित झाल्याचं मला जाणवलं. तिच्या कवितांमधून श्रावणातल्या ऊन-पावसासारखा आशा-निराशेचा लोभस खेळ रंगत जातो. समाजव्यवस्थेचं अभिन्न अंग असणाऱ्या विषमतेविरुद्धचा तिचा प्रक्षोभ 'मेलेल्यांचं जग' मधून उफाळून येतो. ती लिहिते-

''सर्वांना चौकाचौकात खेचून
ढुंगणावर फटके द्यावेत
लालबुंद होईपर्यंत...''

'एक शाखा इकडेही' या कवितेत आपल्या संतापाला वाट करून देत ती म्हणते-

''सरकारी यंत्रणेच्या बुडाला पलिते लावावेत
गरमागरम खुर्चीवर बसून उबवलेत साले''

विद्रोहाच्या नाना कळा तिच्या कवितेत जागोजागी आपल्याला दिसतात.

''का खरिदताल एखादी 'कमला'
तुमचे उच्चभ्रू चेकाळलेपण गोंजारण्यासाठी?''

पुरुषप्रधान व्यवस्थेत वेश्याव्यवसायातून दिसणारं माणसाचं पाशवीपण! वेश्येची ठसठसती वेदना सुषमाला व्यथित करते. एक घुसमटलेली खिडकी, वारांगना, भोगी आदी कवितांमधून आपण ती व्यथा अनुभवतो, अस्वस्थ होतो आणि आपल्या अंतरंगात खळबळ उडते.

‘‘रात्रीच्या गर्भात सकाळ व्याली
भकभकत्या उन्हात शरीरांची आग विझवत
स्वत: मात्र विझून गेली
सगळेच कोनाडे तेवत ठेवत...’’

पुरुषार्थाचं असहाय रूपही सुषमा अतिशय नेमकेपणानं आपल्याला दाखवते–

‘‘सूड उगवल्यासारखा
उपभोग घेतोय तिचा
का माझाच माझ्यावरचा बलात्कार
ती पाहतेय असहायपणे?
जिंकायला निघालो
अन् गाडून आलो
शरणागतीची पांढरी पताका!’’

‘अरे प्रियकरा’ या कवितेत सुषमा विचारते,

‘‘माझ्यात तू ओतलेला विध्वंसकपणा
तुला इतक्यातच गर्भगळित करून गेला?’’

तिचा हा उपहासगर्भ प्रश्न पुरुषी मानसिकतेला भेदून जाणारा आहे.

स्त्री–शोषणाची सावली सर्वव्यापी कशी आहे याचं दर्शन सुषमाच्या कवितेतून आपल्याला घडतं. तिचं जागं झालेलं आत्मभान ते तिचं विश्वभान तिच्या कवितांमधून डोकावत राहतं–

‘‘एकाच वेळी ‘मी’ जगभर असते
सातत्याने कुठे ना कुठेतरी
अत्याचारित होत असते!
माझे शरीर असे विखुरलेले आहे
पण त्या टोकाची वेदना
तितक्याच तीव्रतेने ह्या टोकाला
येऊन भिडते...’’

अत्याचार, शोषण याविरुद्ध बंड करणारी, लढणारी स्त्रीही सुषमाच्या कवितेत आपल्याला भेटते–

आज मनी का पेटते आकाश–

‘‘पण लक्षात ठेव दावेदारा
शांत वरल्या निखाऱ्यात
अग्नी जळतोय अजून..’’

...“भीमकन्या सज्ज झालीय
तुमच्या मस्तवालपणाची
रग जिरवण्या”
दु:ख, दैन्य-दारिद्र्य बघून व्याकुळलेली, विलक्षण दु:खदग्धता!

‘माय म्हंते...’ या कवितेतलं अंगावर काटा आणणारं वास्तव वाचून आपलं मन सैरभैर होतं-

“तेही बिचारं
हातपाय मारून ओढतंय
दूध समजून घाम पीत
तृप्त होतंय!
न ओढून सांगतंय कुणाला?
आकांत मांडायला
फुफ्फुसेही पुष्ट हवीत ना?”

परिवर्तनासाठी कंबर कसून विद्रोह करत असताना भयभीत होणारं मन, दाटून आलेली निराशा, हतबलताही कवितेतून प्रकटते-

“मी लाख म्हणेन सुधारण्याचा
ठेका द्यावा माझ्या हाती
माझे वाटणे माझ्यापुरतेच
घाबरवून टाकतात अंधारातून
अनेक डोळे पिसाळलेले...
मी अजून शतश: विदीर्ण
मेलेल्यांच्या जगात प्रेतवत्”

अहिंसेवर श्रद्धा असणारी सुषमा लिहिते-

“माझ्यातल्या विध्वंसकाला
शांत करण्यासाठी
मी टांगून ठेवलाय डोक्यावरती
छेद दिलेला एक अमृतकुंभ
महामानवाच्या विचारांचा-”

स्त्री-प्रश्न सोडवताना तिचा हा विवेकी विचार स्त्रीचळवळीला बळ देणारा आहे.

स्त्री होण्याची झळ सोसलेल्या बाईला जाणवणारी केस पांढरे होण्यातली सुरक्षितता पुरुषप्रधान व्यवस्थेवर भेदक प्रकाश टाकते. आईच्या सोशिक

आत्मबलिदानाविषयीची कविता मनाला चटका लावून जाते. स्त्री-मनातील विरोधाभास चितारणारी कविता-

''ती त्याला मुठीत ठेवल्याच्या
मदमस्त ग्लानीत धुंद
आणि तरीही म्हणतेय
मला मुक्त व्हायचंय,
मुक्त!''

नवऱ्याचं पुरुषी वागणं सहन न होऊन घर सोडायला निघालेल्या स्त्रीलाच फक्त पोरांच्या व्याकुळ नजरा दिसतात आणि तिची बाहेर पडलेली पावलं त्याला परत सॉरी म्हणायला वळतात! हे बाईचं अगतिकपण समाजात आपल्याला पावलोपावली भेटत असतं. श्रीमंत बाईला गरीब स्त्रीचं उपाशीपोटीचं कविता लिहिणं कसं कळणार? या वास्तवाचा समंजस स्वीकार करत -

''तू माझी वाचकच रहा
मला व्यक्त होताना पहायला
हवं कोणीतरी
निर्भेळ अन् प्रामाणिक''

असं म्हणून सुखवस्तू स्त्रीसाठी सुषमा दोस्तीचा हात पुढे करते.

जगण्यासाठी ऊर्जा देणारी प्रेम ही अतिशय उत्कट भावना. माणसावरील, निसर्गावरील प्रीतीचा आविष्कार, त्यामागची निष्ठा, विश्वास, उत्कटता, आर्तता सर्व सर्व सुषमाच्या प्रियकर, हे प्रिय, गर्द हिरवा ऋतु, एक थेंब, हे लावण्य निसर्गाचे या कवितांमधून नितळ हळवेपणानं चितारलं गेलं आहे. विविध मानवी भावभावना सुषमाला शब्दांच्या चिमटीत बरोबर पकडता आल्या आहेत; मात्र, काही कवितांमध्ये त्या निसटल्याही आहेत.

शेवटी 'पाऊस' या कवितेत गडदगच्च भावनांनी भरून आलेलं आभाळ बरसतं आणि त्या खळाळत्या जळात आपण न्हाऊन निघतो. सुषमाच्या कवितांचा प्रवाह असाच खळाळत राहो, त्यासाठी तिला लक्ष लक्ष शुभेच्छा!

**डॉ. गीताली वि. मं.**
संपादक, मिळून साऱ्याजणी

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध आपले वाचून झाल्यावर आपण हे पुस्तक फ़ॉरवर्ड करू शकता

e Sahity Pratishthan®

eleventh floor

eternity, G1102

eastern express highway

Thane. 400604

Ph : 9869674820

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क कवीकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा नाटक, सिनेमा, सिरियल, स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी कवीची परवानगी घेणे आवश्यक आहे.

©esahity Pratishthan® 2012

# मनोगत

'नांगरून ठेवलेलं शेत' हा माझा पहिला काव्यसंग्रह आपल्या हातात द्यायला मला अतिशय आनंद होत आहे. अतिशय खडतर प्रवास होता हा. कारण प्रत्येक जण आपापल्या कामातून वेळात वेळ काढून या काव्यसंग्रहाच्या कामात जुंपले होते. तेही न कंटाळता. त्या सर्वांचे मी आभार मानते. सुरुवातीपासून या काव्यसंग्रहाच्या निर्मितीपर्यंत न कंटाळता उत्साहाने साथ देणारे राजू (राजेंद्र बहाळकर) यांची मी अतिशय ऋणी आहे. माझी कविता आधी अल्लड, माळरानावर मुक्त बागडणारी अशी होती. तिला वळण लावून पैलू पाडण्याचे काम आमच्या माईंनी (हिरा जनार्दन) केले. व्याकरणाच्या चुका, शब्दांच्या लय-तालाचे भान, कवितेला बांधणं जे म्हणतात, ते त्यांच्याकडून शिकता आलं. आता त्यांची ती शिकवण इतकी मुरली आहे की लिहिताना स्वत:च्या चुका लगेचच लक्षात येतात. आभारी आहे माई. मुळात संग्रह छापला जाईल हीच मुळी अशक्यप्राय गोष्ट वाटत होती. शिवाय इतकी तीव्र इच्छाही नव्हती. आल्या तर आल्या, अन्यथा डायरीरूपात त्या सुरक्षित राहतील ही भावना होती. पण 'आयदान' कार उर्मिलाताई पवार यांच्या सततच्या टोकरण्याने 'तू तुझा काव्यसंग्रह लवकर काढ सुषमा' आणि भारतच्या (भारत बबुताई सातपुते. देहावसान २५ डिसें. २०११) पुढाकाराने 'परिवर्तनाचा वाटसरू', विजय जाधव यांच्या 'सृजन' मध्ये कविता छापून यायच्या. या सर्व चळवळीतील मित्रमंडळींनी दिलेल्या प्रोत्साहनाने मी होकार भरला आणि मग पुढचा

निर्मितीचा भाग अत्यंत उत्साहाने व पद्धतशीरपणे प्रत्येकाने सांभाळला. सर्वांचे आभार. वारंवार व अनेक बदल करूनही न कंटाळता सुबक डीटीपी करणारे शुभांगी एन्टरप्रायजेसचे श्री. संतोष कोंढेकर, अतिशय यथार्थ प्रस्तावना लिहिणाऱ्या व मला लिहितं राहण्याची खूप मोठी प्रेरणा देणाऱ्या 'मिळून साऱ्याजणी'च्या संपादक डॉ. गीताली वि. मं., माझा पहिल्या काव्यसंग्रह आनंदाने प्रकाशित करण्याचे मान्य करणारे सुगावा प्रकाशनचे उषा वाघ व विलास वाघ, ज्याला केवळ 'उत्कृष्ट' म्हणता येईल असे कलात्मक मुखपृष्ठ व आतील चित्रे रेखाटणारे श्री. गिरीश सहस्रबुद्धे, सुबक व दर्जेदार छपाई करणारे स्वरुप मुद्रणालय या सर्वांची मी ऋणी आहे.

माझा निबंध घरी वाचायला घेऊन जाणारे व त्यामुळेच माझा उत्साह वाढविणारे माझे आदर्श विद्यालयाचे शिक्षक श्री. राऊत सर, वेताळाच्या गोष्टी टप्प्याटप्प्याने सांगून माझी उत्सुकता शिगेला पोहोचवणारे आणि त्यामुळेच लेखनाची बीजे पेरण्यात यशस्वी झालेले माझे वडील, 'शीक, शीक' म्हणून अर्धवट राहिलेले शिक्षण पूर्ण करायला भाग पाडणारे, ज्ञानाचा खजिना खुला करून देणारे माझे पती नव्हे गुरु श्री.कृष्णा जाधव, कळत नसतानाही 'वाऽ वाऽ'ची दाद देणारी माझी दोन्ही मुले सह्याद्री आणि गौतमी. कोणाकोणाची नावे घेऊ? खूप कठीण आहे. आभार मानून त्यांचे प्रेम आता इथेच संपवायचं नाही. याही पुढे मला ते हवं आहे... जर मला जगायचं असेल तर... आणि अजून तर मी काही पाहिलेलंच नाही.

हिंदीत मी कधी लिहिलं होतं. 'ये प्यास ही है जो मुझे जिंदा रखती है और मेरी कविता को...'

**सुषमा कृष्णा जाधव**

sushamapoems@gmail.com
Ph. : 8652547769

## कविताक्रम


| | |
|---|---|
| मी काळोखातही रंग भरते आहे | १५ |
| हवा म्हटला तरी मृत्यूही येत नाही | १६ |
| तिने ठरवलं | १७ |
| मला हवा असतोस तू | १८ |
| शिकतेस कशाला बये तू? | १९ |
| आज मनी का पेटते आकाश | २० |
| निर्माल्य | २१ |
| हरवलेले व्याधीग्रस्त | २२ |
| वरवरच्या चर्चेने प्रश्न सुटणार असते तर | २३ |
| अनुभूती | २४ |
| गरिबीचे कलेवर | २५ |
| हे लावण्य निसर्गाचे | २६ |
| स्त्री बया, तुझी कहाणी | २७ |
| तू थोडा हसत रहा | २८ |
| मुक्तीधाम | २९ |
| माझी इच्छा | ३० |
| मी तुझ्यावर प्रेम करीत आलोय | ३२ |
| महामानवाच्या विचारांचा अमृतकुंभ | ३४ |
| नांगरून ठेवलेलं शेत | ३५ |
| आम्हाला म्हणतात ‘मध्यमवर्गीय’ | ३६ |
| हा नारा विद्रोहाचा आमचाही | ३८ |

| | |
|---|---|
| भोगी | ४० |
| ही सुरवात का? | ४१ |
| साहेब | ४२ |
| अतृप्त रात्र | ४३ |
| बाई विचारते | ४४ |
| ती म्हणाली | ४५ |
| वटपौर्णिमा | ४६ |
| मला मुक्त व्हायचंय | ४८ |
| वारांगना | ४९ |
| या जगण्यात काही राम नाही | ५० |
| केस पांढरे होण्यातली सुरक्षितता | ५१ |
| पिता | ५२ |
| विद्रोह | ५३ |
| विरहिणी | ५४ |
| अरे प्रियकरा | ५६ |
| एक थेंब | ५७ |
| अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या होणाऱ्या आम्ही | ५८ |
| असे एकांतातले प्रवास | ६० |
| गर्द हिरवा ऋतु | ६१ |
| मलाही लहान व्हायचंय् | ६२ |
| माझी आई आणि मी | ६३ |

| | |
|---|---|
| कठपुतळी | ६४ |
| एक घुसमटलेली खिडकी | ६५ |
| हे प्रिय | ६६ |
| ... तर बरं झालं असतं | ६८ |
| प्रियकर | ७० |
| ही वाट वेगळी | ७१ |
| मेलेल्यांचे जग | ७२ |
| जाऊ दे होऊनच एकदाचं | ७४ |
| मी आणि माझे अनुभव | ७५ |
| एक शाखा इकडेही | ७६ |
| जाऊन येते परमेश्वराच्या मार्केटमध्ये | ७८ |
| कवी | ७९ |
| त्या वळणावर | ८० |
| कविता | ८१ |
| टेक इट ईझी | ८२ |
| माय म्हंते | ८३ |
| जग तेव्हाचे नाही सुषमा | ८४ |
| मला बघून | ८५ |
| जायचेच आहे तर | ८६ |
| म्हणे सुषमा, 'काय योजिले पाठवून?' | ८७ |
| पाऊस | ८८ |

## मी काळोखातही रंग भरते आहे

तुझ्याच श्वासात जगणे माझे
तुझ्याच आवेगात मरणही यावे
अपेक्षांची माळ अवजड तुला अन्
माझ्याच नजरेतून घायाळ मी

ऋतू येतात नि जातात
तसा तू बदलता वणवा
पेटवून गेलास स्वप्नफुले
ती राखही फुंकून दिली मी

या निशेच्या स्तब्ध चित्रात
काळोखी मी भरते आहे
तुला काय ठावे रे प्रेम... हट
मी काळोखातही रंग भरते आहे

तुझी चाहूल आणि
बेभानशी धावती मी
या जगाच्या अंतापर्यंत वेड्या
माझा शोध घेणे तुला अटळ

◆

## हवा म्हटला तरी मृत्यूही येत नाही

स्वत:च्या श्वासाचा रवही
ऐकू येईल इतकी शांतता
गूढ, अस्वस्थशी...
स्वत:च्या असण्या-नसण्याचेही
भान नसण्याइतकी
दोलायमान स्थिती
कुणासाठी काहीतरी करावे, ही ऊर्मी
तरीही कुठेतरी कमी पडतो आपण
या जाणिवेची चाहूलही नकोशी
स्वत:चा शोध घेणं
अटळ ठरलेलं,
या भूतलावरचं आपलं अस्तित्व
गूढतेकडे झुकलेलं,
नको म्हटलं तरी जगणं हे सरत नाही
हवा म्हटला तरी, मृत्यूही येत नाही

◆

## तिने ठरवलं...

तिने ठरवलं
मीच कॉन्टॅक्ट करीन
कधी दिसला तर
मीच आधी 'सॉरी' म्हणेन

त्याला फक्त लग्नच होते करायचे
केवळ तिच्याचसाठी
पण, तिला संसार होता फुलवायचा
माणसात राहण्यासाठी

त्याची क्षणाची गरज
तिला भावनिक त्रास
तिची मानसिक गुंतवणूक
त्याच्या लेखी तुरुंगवास!

तिच्या कळा, तिची दु:खं
त्याच्या मते 'नेहमीचेच हे सारे'
त्याच्या शरीरावरचा ओरखडाही
तिचं हृदय शतश: विदीर्ण बिचारे



'विभक्त व्हायचंय, खुश्शाल जा
माझ्यामुळेच तुझी ऐट!
बाहेर कुत्रंही विचारणार नाही,'
त्याची मखलाशी थेट

पोरांच्या व्याकुळ नजरा
फक्त तिलाच दिसतात
आणि तिची बाहेर पडलेली पावले
त्याला परत 'सॉरी' म्हणायला वळतात!

◆

## मला हवा असतोस तू...

मला हवा असतोस तू
झेंडूच्या फुलासारखा
गच्च फुललेला,
पूजेला वाहण्यासारखा,
प्रेमाला अर्पित, मूकपणे

मला हवा असतोस तू
रानोमाळ, सैरभैर
तरीही सुरक्षिततेची
ग्वाही देत
आश्वासकपणे

मला हवा असतोस तू
माझ्या मनासारखा
वळणारा, वळवता येणारा
माझं अस्तित्व अबाधित ठेवणारा
नम्रपणे

मला हवा असतोस तू
इतरत्र, सर्वत्र, मुक्तपणे
पण असतोस फक्त तिथेच
जिथे पडतात मला स्वप्ने!

मग मी बघते पुन्हा
रात्र... रात्र...
बेधुंदपणे, बेहोशपणे...
कारण...
तूही होतोस तिथेच संपूर्ण
अगदी मला हवा तसाच!

◆

## शिकतेस कशाला बये तू?

शिकतेस कशाला बये तू
पुरुषांच्या डोक्यावर मिऱ्या वाटशील,
माजघरात जागा तुझी
पोरांचे हागणे-मुतणे नीटसे काढशील

द्रौपदीचे वस्त्र तुझे
पुरविण्या फक्त कृष्णच धावतील
तुझी लाज झाकून
शंभर पत्न्या पोसतील

सुंदर कशाला होतेस तू?
तो तुला हक्कच नाही,
लोकांच्या मग वळतात नजरा
त्यात बिचाऱ्यांचा दोषच नाही!

कुरूपही होऊ नको बाई
मग तर जन्मालाच यायचा हक्क नाही
खायला काळ नि भुईला भार
म्हणणाऱ्यांनाही तोटा नाही

मुलगा होऊ दे म्हणून
नवस करणारीचे मग कौतुक वाटते
लिंगभेद का करता म्हणून म्हणणाऱ्यांच्या
सणकन कानाखाली द्यावीशी वाटते
◆

## आज मनी का पेटते आकाश

आज मनी का पेटते आकाश
सरीवर सरी कोसळताहेत अजून

उद्देशरहित जगणे तरी
जगायचे म्हणून जगतो अजून

शापिताचे आयुष्य आले वाट्याला
तरी देवा, का आम्हा तू भरडतोस अजून

मिळणार नाही याची खात्री तरी
सुखाचे दान मागतो अजून

आजचा दिवस तुझा
ही रात्रही तुझी
पण लक्षात ठेव दावेदारा
शांत वरल्या निखाऱ्यात
अग्नी जळतोय अजून!

◆



## निर्माल्य

माझे हे हसणे
दुसऱ्यांना हसविण्यासाठी
माझे हे रडणे
न्हाणीघरात वाहण्यासाठी
माझे हे उसासे
एकांतात सोडण्यासाठी
माझा हा उन्माद
तुझी आग शमविण्यासाठी
मी माझी कितपत?
माझाच मला प्रश्न पडलेला
पोरांच्या गोतावळ्यात
आपसूकच विरलेला
सर्व आठवून एखाद्या क्षणी
मी उदास होते
पाठीमागून पडलेल्या
तुझ्या आवेगी मिठीमध्ये
मला शेवटी हरवून जावे लागते
खूप काही जगायचे राहिले
तिन्हीसांजी हे आठवत राहते
ओंजळ उघडता वयाची
हाती निर्माल्य राहून जाते

◆

## हरवलेले व्याधीग्रस्त

या शरीराला अनेक व्याधी जडतात
फुकटात मिळतात म्हणून
फुकटात घेतल्या जातात
मीही असा एक उपकारग्रस्त!

मला एक संमेलन घडवून आणायचेय
स्नेहसंमेलन,
अशाच व्याधिग्रस्तांचे
पण, 'मी सर्वात सुखी'चा
आव आणणारेच अधिक
संमेलन घडवून आणणेच
जिकिरीचे

जखम खरी आहे कुठे, नि
मलम लावू पाहतोय कुठे!
खरी कीड तर पोसते आहे मजेत
आणि मी शोधतो आहे मूर्खासारखा
हरवलेले व्याधीग्रस्त!!

◆

## वरवरच्या चर्चेने प्रश्न सुटणार असते तर...

वरवरच्या चर्चेने प्रश्न सुटणार असते तर...
तर प्रत्यक्षात स्त्रिया दुपारचे सोप ओपेरा
बघण्यात वेळ खर्ची घालत नसत्या.
आपल्या सुपीक डोक्यातून
अफलातून कल्पना, तोडगे
त्यांनी आपणास दिले असते.
राज्यकर्त्यांनी दुसरा मार्ग चोखाळला असता
वेळखाऊ धोरणाचा,
सुरक्षित राजमार्ग सोडून
मूळ मुद्द्यापासून दूर जाण्याचा.
या जुनाट रोगाचे निवारण
करण्याचे औषध
सध्यातरी कुठल्याही वैदूकडे नाही.
स्वत:चे शरीर आतून पोखरण्याचा
नवीन छंद जोपासलाय प्रत्येकाने.
नियमबाह्य नियम मोडीत काढीत
नवीन उपजतात भूछत्र्यांसारखे
रात्रीचे अंकुर वृक्ष बनतात
दुसऱ्या दिवशी फळं धारण करून;
तेव्हा खाताना...
माझ्याच रक्त-मांसाचा वास येतो त्यांना
सध्या शिसारी विसरून
गिळण्याची सवय करून घेतलीय
जीव देता येत नाही, घेताही येत नाही म्हणून!

◆

## अनुभूती

या नितळ काळोख्या चादरीवरती
मी माझी स्वप्ने पेरली
ती अशी मधेच टिमटिमतात
ह्या वळणदार वाटांवरती
लालबुंद पांगारा हा
टपटपतो आहे
माझ्या दुखऱ्या हृदयातून ठिबकणाऱ्या
रक्ताला शोषून घेण्यासाठी.
आप्तांच्या पळत्या सावल्या
खुणावत 'ये पकड आम्हाला' म्हणताहेत
'तुझ्याच तर आहोत आम्ही'!
आणि मग सुरू होते शर्यत,
'पळा पळा, कोण पुढे पळे तो'!
रस्ते गर्दीने फुलतात तेव्हा
मला हटकून लागते समाधी
एकांताची ही अनुभूती
गुदमरतानाच का व्हावी अशी?
◆



## गरिबीचे कलेवर

बराच काळ उलटून गेला
तृप्तीने ढेकर काही दिला नाही
पोटभरून जेवायचे म्हणतो
साधे ताटही समोर येत नाही
पंगतीपाठोपाठ पंगती उठताहेत
सनई चौघडे वाजताहेत
माझं मुटकुळं तिकडे कोपऱ्यात
पिळवटून टाकणारी आतडी
सावरती थरथरते हात
गरिबीचे कलेवर घेऊन पडलो
हाडकी हाडोळे कुरवाळत बसलो
वासनांनी मात्र उत्साहाने जिंकली
बायल माझी वर्षागणिक 'बसली'
डोळ्यात नभ ओथंबले
अर्धे मसणात जाऊन पडले
जातीचे हे शहाणपण देवा
भडवीचे या मानवाला काहून दिले!!

◆

## हे लावण्य निसर्गाचे

गर्भाळलेले ढग
चाललेत उसासत,
हपापल्यावानी
गिळंकृत करीत
सह्याद्रीची रांगच्या रांग,
पोटुशीचे डोहाळे पुरवत
रसरसते मुलायम गालिचे!
तांडव की काय ते
ह्यालाच म्हणतात का?
बेभान लय अंगात
धा धिन धिन तिन...
डोळे बंद करून
खोलवर भरून घ्यावा
गंधवतीचा सुगंध
नेमेची येतील न येतील
हे दुर्लभ क्षण
पदरात पडेल न पडेल
हे निर्मिकाचे धन
साठवून ठेवावे
धुंद होऊन मनात
हे लावण्य निसर्गाचे
अश्राप... अप्रूप...

◆

## स्त्री बया, तुझी कहाणी...

वरकरणी हसलीस तरी
धाय मोकलून रडत नाही
पिळा पडतो अंतरी
तरी हृदय उमलून येत नाही

तुझ्या सोशिकतेला काय दाद द्यावी
तुझ्या दुःखाने धरादेखील कलत नाही
स्त्री बया, तुझी कहाणी
अंतरीचा ठाव घेत नाही

मिटल्या ओठी हुंदका तुझा
अश्रू तुझे झरझरत नाहीत
तुझ्या शरीराचे लचके अन्
प्रेताला जळणही मिळत नाही


तुझ्या जननांगात खुपसल्या काठ्या
जननी ही विसरून नराधमांनी
विटंबना किती करावी रे या देहाची
अरे विधात्या, तुला लाज का येत नाही!
◆

## तू थोडा हसत रहा

तू थोडा हसत रहा
माझ्या जीवनाच्या सुसह्यतेसाठी
ही उतरंड लीलया पेलण्यासाठी
तू जरासा हसत रहा
ह्या हास्यातला औषधी गुणधर्म
तुला समजो न समजो
मला आत्ताशा कळले,
जेव्हा सर्व नाती
नग्न कवायती लागली करू
माझ्या समोरच
तेव्हा
सगळे राग, लोभ, मत्सर
गळून पडले नकळत
ओंजळीत राहिले फक्त
तुझे निरागस हसू.
जन्माला पुरून उरण्याइतके
तुझे निर्मळ, निर्व्याज हास्य
ओंजळीत घेऊन
प्यावेसे वाटते अधीरतेने;
तू जरासाच हस
आजकाल त्यासाठीही
प्रयत्न करणे तुला जाते जड.
इथे उभी आहे रे
या सरळ वाटेवर
तुझ्या हास्याला झेलणारी
एकटी मी!

◆

## मुक्तीधाम



मनातल्या दु:खांनी, सुखांनी
सुरू केलाय धांगडधिंगा
वाट फुटेल तसे पळताहेत विचार
त्यांना थोपवणं आता
जवळपास अशक्य होत चाललंय
म्हणून तटस्थपणे अवलोकन करतेय
ह्या विचारांच्या लाटा
अंगभर फेसाळून, आपटून
ओसरताहेत
मी आज निश्चल, तटस्थ
आता कुठलेही वादळ
हलवू शकणार नाही मला
विदीर्ण करू शकणार नाही
ना आनंद, ना दु:ख,
ना लोभ, ना मत्सर,
ना लालसा, ना विरक्ती
इतक्या लवकर यावी
ही स्थिती?
कोणाला पटो वा न पटो,
मला जाणवतेय
माझ्या मनाने स्वीकारलीय
निरामय निवृत्ती

◆

## माझी इच्छा

तू निमित्त बनावेस
माझ्या विस्तारलेल्या क्षितिजाचे
अनुभवावी अंतर्मुख होऊन
माझी अंतर्मुखता
मला हवी असलेली शांतता
क्षणभरच...
द्यावी विशाल होऊन
माझी चिडचिड
लहान मुलागत
घ्यावी समजून
तू दिलास ज्ञानाचा
खळखळता झरा
किती अबोधपणे!
तुझ्या सुरक्षित वरदहस्ताखाली
मी बेडरपणे वावरते
समाजातील विषारी तण शोधून
उपटून टाकण्याची भाषा करत.
तू निमित्त बनावे
माझ्या नि:शब्दतेचे,
मूकपणे समजून घेत.
डोळ्यात मला वाचता यावे
तुझे नि:सीम प्रेम, अखंड

तू निमित्त बनावे
माझ्या पुढच्या वाटचालीसाठी
माझ्यातल्या 'मी'चा शोध घेताना
माझे हरवलेले, विखुरलेले मन
गोळा करून टाकावे जोडून
तुझ्या शाश्वत प्रेमाने
तुझा हात फिरावा अलगदपणे
धूळ झटकत
माझ्या मृत्यूनंतरच्या दगडावर
तुझे अश्रू पडावेत दोन
माझ्या अतृप्त ओठांवरती
◆

## मी तुझ्यावर प्रेम करीत आलोय

मी तुझ्यावर प्रेम करीत आलोय
अन् करीन अविरत
तुझ्या मनाचे कोपरे धुंडाळतोय
कुठे फट दिसतेय का मनात?
चटकन शिरता येईल.
पण तू ते आपणहून बंद केलेस,
अन् म्हणतेस
'गडे, तुमचं माझ्यावर प्रेमच नाही'
मी फुलांचे गुच्छ
बाजूला मांडून बसलोय
आणि तू पिठाळलेल्या केसांनी,
फोडणीच्या वासाने भरलेल्या,
खोचलेल्या गाऊनमध्ये दिवसभर
पोरांची नि माझी जेवणं
तुझा एकमेव ध्यास
कधी तरी 'शॉर्टकट' मारत जा...!
आणि मग बातम्यांशिवाय
माझ्यासमोर पर्याय उरत नाही
'काय मेलं ते रोज रोज बातम्या बघणं'
तुझं हे रोजचंच रडगाणं
तुझ्या चटचट हलणाऱ्या
अजूनही यौवनातल्या,



रेखीव बांध्याकडे बघत
उसासे टाकण्यापेक्षा हे बरं
नाहीतरी आम्ही असे काय
कल्याण करणार जगाचे?
आपला संसार तू
गृहीत धरू नकोस, प्रिये
ह्या वयात कोणी मला
‘घासही’ घालणार नाही
म्हाताऱ्यांना अप्सरा
सिनेमातच मिळतात
आमच्यासारखे... एकमेव पत्नीकडे
डोळे लावून बसतात
◆

## महामानवाच्या विचारांचा अमृतकुंभ

मला नको तुमची भीक
मी जगायला शिकले आहे स्वत:च
कोणाच्याही मदतीशिवाय
मला नको आहे तुमचं सांत्वन
मानवी मनाचे सर्व षड्रिपू
बासनात बांधून ठेवलेत, मी स्वत:च
मला रडायचे असेल तर..
रडेन धाय मोकलून;
हसायचं असेल तर...
हसेन... डोळ्यात पाणी येईपर्यंत,
राग आला तर
कातडी सोलून काढीन एकेकाची
करुणा आली तर...
चामडी सोलून देईन स्वत:ची
मला आजमावून पाहू नका
तुमच्या जगण्याच्या मार्गापासून
वेगळा आहे माझा मार्ग
मी बनत चालले आहे
एक स्फोटक!
तुमच्या मार्गाला धक्का न लावता
मी आहे एक आग!
मी अफाट जलप्रपात!
माझ्यातल्या विध्वंसकाला
शांत करण्यासाठी
मी टांगून ठेवलाय डोक्यावरती
छेद दिलेला एक अमृतकुंभ
महामानवाच्या विचारांचा

◆

# नांगरून ठेवलेलं शेत

माझी चेतना परत आलीय
यावेळी मला तिने
गदगदा हलवून जागं केलंय
ती म्हणतेय मला... 'ऊठ'
मी आळसावून म्हणतेय
'जाऊ दे, अजून पुष्कळ वेळ आहे माझ्याजवळ..
अं.. इतरांजवळही...'
ती म्हणतेय 'मूर्ख! तुला दिसत नाही का?
पूर्वेचा रंग जास्तच लालभडक आहे आज
रणकंदन चाललंय तिथे'
'हो,.... दिसतंय मला'
'ऊठ... पाण्यावर मेलेल्या माशांचा
खच तरंगलाय नि
बायका, घागरी घेऊन चालल्यात!'
'हो, दिसतंय मला'
'ऊठ वेडे! दिसत नाही का तुला?
नद्या, सागरांनी आपली सीमा ओलांडलीय
नि घरं कधीही बुडतील,
तुझ्या घरासकट'
'हो.. दिसतंय मला'
'मग बयो, उठत का नाहीस अजून?'
'हं!... होऊन जाऊ दे एकदाचं साफसूफ,
माझ्यासकट...
मी बी पेरून जाईन जाताना
उगवेल नवीन शेत ताजे-तवाने
नांगरून ठेवलेल्या शेतातून'

◆


## आम्हाला म्हणतात 'मध्यमवर्गीय'

दिवसा-ढवळ्या सूर्य उगवतो
याचेच अप्रूप वाटते तिला
रात्रीचा चाळीसचा बल्ब पेटतो
तेव्हा कळते, अरे वा! रात्र झाली!
एका दहा बाय दहाच्या खोलीत
लेफ्ट-राईट-बाल्कनीत, 'पेइंग गेस्ट'
मधे मालक राहतो तेव्हा,
मग भाडे मागायला
जास्त दूर जावे लागत नाही
आणि कपाटाशेजारचं टेबल
होतो किचनचा कट्टा
स्टोव्हवर नेहमीप्रमाणे भात शिजतो
आज थोडी डाळ पडलेली असते
पंधरा वर्षांचे साहेबराव
दारू पिऊन तर्र झालेल्या बापापुढे
सर्रास विडी ओढत
आईला 'ऑर्डर' सोडत असतात,
'बांगड्याचा रस्सा जरा झणझणीत बनव;
कित्येक दिवस वशाट खाल्लं नाही.'
आणि नुकतीच ज्वानीत
पाऊल ठेवू लागलेली बहीण
थोरलीला म्हणते,

‘तुझं जरा लवकर बघ लग्नाचं,
नाहीतर तुझ्यासाठी मी थांबून राहायची नाही,’
कुणी लग्न करतात का हो लग्न?
काळा-बेंद्रा, विद्रूप-चिद्रूप, बिजवर-तिजवर
कुणी का असेना, पण जनावर नको.
ह्या जंगलापासून मुक्तता हवी...
ही विध्वंसक जंगले
अशी उगवलीत जागोजाग
सूर्य उगवतो तेव्हाही कळत नाही,
ढळतो तेव्हाही नाही
तुम्ही आम्ही पाहात राहायचे फक्त
टाकत उसासे
दोन्ही हातांच्या ओंजळीत
हनुवटी टेकवून
आम्हाला म्हणतात ‘मध्यमवर्गीय’!
◆

## हा नारा विद्रोहाचा आमचाही

कुणीही यावं आणि
हे शरीर घेऊन जावं
ओरबाडून टाकावं मनसोक्त
हवे तसे...
काय बिशाद, वेदनेचा जाळ
बाहेर निघेल!
वीस... तीस... पन्नास...
नशीब जोरावर तर
शंभराचीही लॉटरी लागते
कधी मधी...
पोटाची खळगी अशीच खोलवर
झोपताना 'त्या' वेदनेपेक्षा
'ही' झोपू देत नाही
त्यांची भागते भूक
पण आमची ही खरी भूक
भुकेजलेली...
ही मिटतही नाही, इतकं मिटूनही
साला, वर काय शेण खात
बसला का रे बघत
स्वत:च्याच आईचे धिंडवडे?
तुझ्या पूजेला आमची
खेटरंही का विटाळावीत?



दल्लीच्या फेकलेल्या
तुकड्यातून त्या येतात
आमच्यावर कथा लिहा, सिनेमाही काढा,
वा होईल एखादी संस्था ‘गब्बर’
करताल का हो लग्न आमच्याशी?
वारस द्यायला लायक?
का खरिदताल एखादी ‘कमला’
तुमचे उच्चभ्रू चेकाळलेपण गोंजारण्यासाठी?
हा नारा विद्रोहाचा आमचाही
ह्या नपुंसक अवलादी
फ्लडच्या मातीबरोबर
उपसून गेल्या असत्या तर...
जे.सी.बी. लावून
फवारत बसलो असतो
डी.डी.टी. त्यांच्या मर्तिकांवर
◆

## भोगी

कमरेखालचे भोग
भोगताहेत अधाशासारखे
सुख समजून
ओरबाडताहेत मुक्तपणे
माझे डोळे मात्र स्थिर
तिच्या नितळ पाणीदार डोळ्यात
ती अंदाज घेतेय
माझ्या प्रेमाचा... अधीरतेने
अन् मी लज्जितसा;
स्वत:वरच
सूड उगवल्यासारखा
उपभोग घेतोय तिचा
का माझाच माझ्यावरचा बलात्कार
ती पाहतेय असहायपणे?
जिंकायला निघालो
अन् गाडून आलो
शरणागतीची पांढरी पताका!

◆

## ही सुरवात का?

सगळ्या शिव्या लिंगावरच
का येऊन घसरतात?
किंवा मेंदूत सतत
उलथापालथ का होत राहते?
किंवा... काही नको असलं तर
विरोध करण्याचं टेन्शन का येतं?
आपल्या बाजूला बसलेला विरोधक
जितका स्ट्राँग... तितका
जवळचा का निघतो
किंवा तू रिकामा रहा
म्हणून मेंदूला
कितीही स्वयंसूचना दिल्या
तरी विचार खिदळत का राहतात?
कशी जिरवली म्हणून...
आपलाच राग यावा
या टप्प्याला येऊन पोहोचणं
म्हणजे... असं तर नाही ना
की आत्ताशा झालीय
खरीखुरी सुरुवात?
◆

## साहेब

आभाळ कसं गच्च भरलं होतं
आत्ता भार असह्य होऊन
कोसळेलसं वाटत होतं
ह्याला हळूच भांड्यात एका
गोळा करून घेऊ
एखाद्या खड्ड्यात
रितं करून टाकू
रोजचा पाण्याचा प्रश्न तर मिटेल
रोज कामावरून घामाने लडबडीत होऊन,
ट्रेनच्या प्रवासात मिश्र वासाचे जंतू
अंगभर चिकटवून घेत,
गाड्यांनी फेकलेल्या धुराळ्याचा लेप
त्यावर चढवून येतो घरी
नि उत्साहाने हफ्ताभर न धुतलेला टॉवेल घेत
नळ खोलतो तर...
सॉ ऽ... आवाज करत
नाटकी रडणाऱ्या बाईसारखी
दोन टिपं, टाप्... टाप्... करीत
कोरड्या बादलीचा तळ ओला करतात
चार दिवसांचं शिळं पाणी
घशात रितं करून ऑफिस गाठतो
तर खुर्चीत बूड टेकवायलाही लाज वाटते
अन् म्हणं 'साहेब' आपण!

◆

## अतृप्त रात्र

सगळीकडे नुकतीच फुलत चाललेली
कोवळी लुसलुशीत रात्र!
अजून पाळीने चिंब न झालेल्या
कुमारिकेसारखी चंचल वाटावी अशी रात्र!
सर्व आयुधांनिशी चंद्राने मस्तीत
हळूच ढगातून डोकावले की
लग्नाला होकार देणाऱ्या
लज्जायुक्त युवतीसारखी रात्र!
एखादा रंगेल, शुभ्र ढगाचा
पातळ तलम बुरखा आला की
पहिल्या संभोगाच्या भीतीने
गांगरलेल्या नववधूसारखी वाटावी अशी किंवा...
ऐन जवानीत मिलिटरीवाल्याची
विधवा झालेली, फटफटीत चेहऱ्याची
'सुंदर बायको' वाटावी अशी रात्र...!
या रात्री अंत:करणात पूर्ण झिरपून
शांत तरी कशा करतील?
न भेदता येणारं
ह्या रात्रींचं हे गूढ
किंकाळ्या मारीत सुटतं
मेंदूत अतृप्तपणे
भिववितात त्या अज्ञात गूढगुहा
मग ह्या जागृत नसांना
झोप येईपर्यंत
द्यावच लागतं ना
काहीतरी खाद्य?

◆

## बाई विचारते

बाईने मला विचारलं
‘बाई, तू अशाच कविता
का लिहितेस?
‘म्हणजे कशा?’
‘दु:खांनी भरलेल्या...’
तिला म्हटलं,
‘बाई, उपाशीपोटी विद्रोह येतो,
भरल्यापोटी थोडी
डुलकी काढावीशी वाटते
काय करू गं?
माझे ताट मलाच वाढून घ्यावे लागते
सर्वांना वाढून झाल्यावर.
भुकेल्यांची संख्या संपत नाही,
तोवर मला जेवता येणार नाही.
आणि माझे उपाशीपण
मला गुंतून ठेवतं कविता लिहिण्यात
भूक मिटल्यासारखी वाटते मग
पोटात अन्न न जाताही...
तुला नाही कळायचं बाई,
बाईच्या जातीला आलीस तरी...
तू माझी वाचकच रहा
मला व्यक्त होताना पहायला
हवं कोणीतरी
निर्भेळ अन् प्रामाणिक

◆



## ती म्हणाली

ती म्हणाली
'ह्या पन्नाशीच्या बाईत
त्याला काय मिळणार?
मी जरी ठरवलं तरी...'
हसून टाळी दिली मीही
तिच्या दिलखुलासपणाला...
आणि त्या लंपट अधिकाऱ्याची
भयंकर दया आली
कारण माझ्या नजरेसमोर
तो उभा, पट्टा घातलेल्या कुत्र्याप्रमाणे
आज एका सुशिक्षित स्त्रीने
उडविला होता त्रिफळा
त्याच्या पौरुषाचा
वा रे अधिकारी!
आणि
सरकार मुर्दाबाद!

◆

## वटपौर्णिमा


आमच्या डोळ्यातली वेदना
‘तुम्हाला’ वाचता आली तरी खूप झाले
मग चोवीस तास वडच काय
बाभळीभोवतीही फिरू गरागरा
आम्ही लाख म्हणू ‘हो’ पण...
तुमची गोची का म्हणून करावी?
‘त्या’ किंवा ‘तिकडच्यांची’ असहायता
वडाच्या फांदीभोवतीची
मंदिरात पुजाऱ्यासमोर
नीट काठीला बांधून
उभी केलेली
बाटलेला भटही अखंड बडबडतोय
त्याला ठाऊक आहे पक्कं
ह्या मंत्रावळ्या ह्यांच्या
डोक्यावरुन जाताहेत त्या
तेव्हा ‘य’ ला ‘य’, ‘म’ ला ‘म’
लावतोय साला
‘गर्दीत सवाष्णींच्या
माझी बायको दिसतेय का?’
म्हणून उत्सुकतेने बघणारा
हिरमुसून परततोय आणि...
ती वाट पाहून, पोटभर जेवून

ताणून देतेय चटईवरती
त्याला आठवताहेत दिवस
अंगात, गांडीत, शिश्नात
रग होती तेव्हाचे
त्याने काढलेले गबरू
आजकाल समोर ठाकतात
तेव्हा ओघळत चाललेले संकेत
हलकेच शीळ घालून
सावध करतात.
ती अजूनही हलक्याशा
खाकरण्याने जागी होते
वड मुळासकट काय नि फांदी काय
निशाणी सोडून जातात
येऊन गेलेल्या पुराच्या

◆

## मला मुक्त व्हायचंय

तिचा आनंद,
तिच्या व्यथा
सर्व त्याच्याभोवती
तो केंद्रबिंदू आणि
ती वर्तुळाकार फिरती चक्री
तो मजेत शेषनागावर पहुडलेला
ती त्याला मुठीत ठेवल्याच्या
मदमस्त ग्लानीत धुंद
आणि तरीही म्हणतेय
'मला मुक्त व्हायचंय्
मुक्त!'
◆




## वारांगना

रात्रीच्या गर्भात सकाळ व्याली
भकभकत्या उन्हात शरीरांची आग विझवत
स्वत: मात्र मिटून गेली
सगळेच कोनाडे तेवत ठेवत

उघड्या दाराची भीती सातत्याने
हिच्या भीतीकडे कोणी बघतही नाही
ओठावरच्या हास्यामागे
कोण रडतंय, कळतही नाही

तिची पिल्ले तिच्याच मैत्रिणीकडे
वाट बघत ती 'मोकळं' होण्याची
आणि मैत्रीण…
आरशाच्या तुकड्यासमोर तयार होत
वाट बघत स्वत: 'व्यस्त' होण्याची

तिलाही हे सर्व नको असतं
पण हिरवी नोट परत जाणं परवडणारही नसतं
कधीतरी होईल सुटका या यातनाचक्रातून
या आशेवर दुभंगलेलं मन जगत असतं
◆

## या जगण्यात काही राम नाही

या जगण्यात काही राम नाही
भूत नाही, भविष्य नाही
वर्तमानात भक्क उजेड
श्रीमंती वाकुल्या दाखवत
अंगावर सरसरत येत आहे
गरिबीची लक्तरे
फेकून द्यावीशी वाटत नाहीत
या जगण्यात काही राम नाही
सकाळी उठतो, हात जोडतो,
सर्व 'पॉझिटिव्ह थिंकिंग'
आठवून आळवतो
'निगेटिव्हिटीला' थारा नाही
तरीही यशाची चव उतरत नाही
या जगण्यात काही राम नाही.
डिग्ऱ्या झुलवतो
उधारीच्या स्टायलीत राहतो
'पॉलिश्ड' मित्र जुळवतो
मिलेनियम हसू फेकतो
पोरी फिदा, पण खिशात दाम नाही
या जगण्यात काही राम नाही.
मातीत घाम गाळायला लाज वाटते
खुर्चीत झुलायची मिजास भावते
आत्मविश्वासाने पण कच खाल्ली
प्रत्येक इंटरव्ह्यूत इथेच मात खाल्ली
जग मात्र चाललेय पुढे
आपल्यातच त्राण नाही
आणि म्हणतोय जगण्यात काही राम नाही
◆

## केस पांढरे होण्यातली सुरक्षितता

केस पांढरे होण्यातली सुरक्षितता
अशी तशी नाही समजून यायची कोणाला
स्त्री होण्याची झळ खूपशी सोसली
चमकू लागली चमक केसाकेसांत
मन हलके होऊ लागले सखे गडे!
आकसून जाणारे शरीर
सैलावत चालले नकळतपणे
स्वराची धार वाढली आपसूक
नजर भिडू लागली थेट... निर्भीडपणे
नि लोक म्हणू लागले 'मॅडम' मला
येऊ लागलेल्या वार्धक्याचे
पायघड्या घालून स्वागत करायची
उर्मी दाटते चोवीस तास
ही अवस्था खूपच रोमँटिक वाटते
ह्या वेगळ्या अर्थाने

◆

# पिता

तुझ्यात हरवून जातो
स्वत:ला विसरून जातो
तुला खेळताना बघून
अलगद हसून जातो
तुझ्यातला मी,
तुझ्याभोवतीच गोळा
रक्ताला रक्ताचा हा
आपसूकच लळा
असतोस जरी दूर
आसपास अस्तित्व तुझे
वाटतच नाही माझ्या लेखी
हे लाडके कोकरू माझे
तुझं गोंडसपण घ्यावं कवेत
वर्षाव करावा प्रेमाचा
घासावा तुझ्या गोबऱ्या गालावर
खडबडीत गाल माझा
प्रत्येक उत्तुंगाशी करतो
तुलना मी तुझी
कसा होशील? कसा राहशील?
कसा दिसशील?
छट्! तो विचारच नको आता
ही फ्रेम अशीच चिरकाल टिकावी
तुझ्या निष्पाप बालपणाची
बस्... ही एकच प्रार्थना माझी

◆



# विद्रोह

आजचा पोटभर आकांत
उद्याच्या तीव्र डरकाळीसाठी
शोधते आहे एक उसंत
व्यस्ततेच्या सुरवातीला
अजूनही हटत नाहीत
काळे ढग
जमीन फाटून येऊ पाहतोय
ज्वाला उद्रेक
खुडून गेल्या कळ्या
पारिजातकाच्या
राहिले देठ अग्नीशलाकांचे
पायदळी तुडवल्या किती
कुसुमांच्या माळा
राहिला निवडुंग उभा
फणा काढून आता

◆

## विरहिणी

अशाच एका अंधाऱ्या रात्री
संपूर्ण काळोखात
गुरफटून घेतले स्वत:ला
नेहमीसारखेच
उगीचच डोळे फाडफाडून,
पापण्यांची नाजूक फडफड करीत
प्रकाशाचा वेध घेण्याचा
केला एक निष्फळ प्रयत्न.
दिवसभर वळवळणारे
मेंदूतले किडे
आत्ता कुठे होते सुस्तावले
काही अर्धवट गुंगीत,
काही पुरते बेहोश झालेले,
काही अस्वस्थही,
बरेचसे भोगलालसेत लिप्त झालेले
तरीही भोवतीची हवा
संथ होती, शांत वाटत होती
वरकरणी धुंदावलेली पण...
सुप्त अदृश्य ज्वालामुखीसारखी
त्या अंधारात स्वत:ला शोधायचा
निष्फळ प्रयत्न चालला होता,
काही गमावल्यासारखा

चाचपडत, ठेचकाळत,
दरवाजा उघडून बाहेर यावे तो
आतील अंधार अधीरपणे
बाहेरील अंधारात मिसळून गेला...
मीलनोत्सुक स्त्री-पुरुषाप्रमाणे
एकटेपणाची जाणीव अधिक तीव्र झाली.
हात उगीचच शरीर चाचपडू लागले
तोच शेजारच्या घरातला दिवा लागला
आणि एक अस्पष्टसा उसासा
त्या अंधारात मिसळून गेला
◆

# अरे प्रियकरा

अरे प्रियकरा, मास्तुऱ्या
वर्ग पूर्ण झाला की रे
तुझा विद्यार्थी तयार झालाय
माझ्यात तू ओतलेला विध्वंसकपणा
तुला इतक्यातच गर्भगळित करून गेला?
माझ्या शांत मनाला
अशांत करण्याचं
सारं श्रेय तुलाच जातं.
तुझ्या 'वाक्‌कौशल्याने'
माझं 'भाषाज्ञान' विशाल झालंय
आणि सर्व उभयान्वयी अव्ययं....
अवयव...
माझ्यासमोर कवायती करतात.
तुझे उपकार अगाध आहेत माझ्यावर!!!
नवे दालन उघडे केलेस
तू माझ्यासमोर
आता मी कशालाही
घाबरत नाही
कुठच्याही वाक्याची 'फोड'
मला लाज आणत नाही
एखाद्या वेळी मीच सहज
बोलून जाते
आणि तू लाजून
पुस्तकात मान खुपसतोस
तेव्हा उगाचच वाटून जाते
गुंफा बंद होती तेच बरं
नव्हतं का?

◆



## एक थेंब

ओल्या भाराने गळून गेलेल्या
झाडांच्या फांद्यांतून, पानांतून
टपकन गळून खालच्या
ओल्याकंच मातीत मिसळावे
मग वाहत वाहत
निघावे भरकटत
कुठल्याशा खट्याळ पोराने
सोडलेल्या कागदी होडीभोवती
धरावा थोडा फेर..
मग खुद्‌कन हसत
जरा पुढे सरकावे
रस्त्याच्या कडेकडेने सळसळत निघावे
नि सफाईदार वळण घेत
लागावे उतरणीला
शेजारच्या सदाफुलीला
हलकेच डोळा घालत,
चाफ्याला हुंगत
पाखरू पाखरू व्हावे –
आणि झोकून द्यावे
त्या नदीत
तृप्तीचा बनून एक थेंब!

◆

## अर्ध्या हळकुंडाने
## पिवळ्या होणाऱ्या आम्ही

अर्ध्या हळकुंडाने
पिवळ्या होणाऱ्या आम्ही
आम्ही काय जग जिंकणार?
कितीही गरजल्या मनीमावशी
घरच्या वाघापुढे आमची वाट लागणार...
आमच्या भाळी ठसठशीत टिळा
तुम्ही मात्र खुर्च्या उबविणार...
दाराची वाजताच बेल
आम्ही बुरखा पांघरणार.
बाबासाहेब म्हणाले,
महात्मा फुले कळवळले,
'पोरींनो शिका, पोरींनो शिका'
शिकलो,
शिकून पोरांना टॉपला पोहोचवायलाही
नाही विसरलो
'गावंढळ' या आईला बघून
आता पोरगं म्हणतं,
'आई, तुझी लाज वाटते
माझ्या हाय फाय मित्रांसमोर
माझी इज्जत जाते'
पोरगीही मंग म्हणते

‘शी ऽ किती अजागळ राहतेस
बाकीच्या मम्म्या बघ, अन् तू...
प्लीज ट्राय टू अंडरस्टँड मॉम...’
नवरा काय? त्याने वेळ दिला पूर्वी
आता ‘तो’ मार्गी लागला
आणि आम्ही?...
वाट पाहायचे दिवस सरले
पहिले वाट पाहण्यात घालवले
आता बघतो स्वप्ने
सांदीकोपऱ्यात हरवलेली
अन् पुटपुटणेच बाकी राहते
‘वेळीच सावध झालो असतो
तर बरे झाले असते’
◆

# असे एकांतातले प्रवास

असे एकांतातले प्रवास
विदीर्ण करत
कणखर करुन जातात
नव्याने प्रसवण्यासाठी
एक निग्रही स्त्री.
गाडीबरोबर वेगाने पळणारी झाडे
सपासप आसूड ओढत असतात
पळपुट्या मनावर
आणि बजावत असतात
‘तू इथेच आहेस,
तुला लढावंच लागणार आहे.’
माझ्या अजेंड्यावर
ह्या गोष्टी सहजच येत नाहीत
माझ्या कपटहीन जगात
मात्र त्यांचीच पिलावळ जास्त आहे,
जे शोषून घेतात
माझ्या रक्तातील थेंब न थेंब
आता मला वाटतं,
विसरायला हवं माझं स्त्रीपण.
दंड-बैठका काढून
शरीर पिळदार बनवावं
दणकून द्यावी भीमगर्जना
ही लेक तयार झालीय
भीमकन्या सज्ज झालीय.
तुमच्या मस्तवालपणाची
रग जिरविण्या

◆

## गर्द हिरवा ऋतु



डोंगरमाथ्यावरचं घनदाट जंगल
खुणावतंय मला
ती कवेत घेण्यासाठी
आसुसलेली झाडे,
त्यांच्या उंचच उंच
कवायतीखालचे
माझे खुजेपण बोचरे
प्रचंड कोलाहलाच्या वेणा पचवून
शहरे, नगरे, उपनगरांच्या डिलिव्हऱ्या,
ही रेल्वेची आतड्यांची माळ,
दुर्गंधीला सरावलेली माणसांची घरटी,
शहरी डोहाळे भरपूर झाले
इतके निढावलेले मन
नकोच आता...
कुठेतरी हिरवा उंचवटा दिसतो
नि माझे मन 'रान' होते
धाव... धाव... चौफेर उधळ!
वेडी होशील इथे
हे भरगच्च हिरवेपण
प्रत्येक ऋतूत घे शोषून
बालपणी, तारुण्यात, वार्धक्यातही...
◆

## मलाही लहान व्हायचंय्

मलाही लहान व्हायचंय्
पोरांचं बोट पकडून
अखंड बागडायचंय्
लॉलीपॉप चघळायचाय
म्हातारीचे केस तोडायचेत
बर्फाचा लालबुंद गोळा
चुपूक... चुपूक... ओढायचाय्
बिस्किटांच्या आतील क्रीम खाऊन
रिकामी बिस्किटं परत पुड्यात ठेवायचीत्
हट्ट पुरवून घेण्यासाठी
हट्टाने पाय आपटायचेत
नवऱ्याकडे मूल होऊन
'लहानपणा'चे डोहाळे पुरवायचेत
मला हे व्हायचंय
मला ते व्हायचंय
माझ्या कल्पेनेचे मनोरे
भरारत राहिलेत... आणि
माझ्या आधी 'त्या'नेच
पहिला नंबर लावलाय
मोठेपणाचं राज्य माझ्यावर आलंय
सध्या 'त्या'चे डोहाळे पुरवणं चाललंय
कधी येईल माझा डाव?
वाट पाहणं चाललंय्...

◆

## माझी आई आणि मी

तू जास्त चिंता करू नकोस आई
तुझ्या नकळतही मी शिकत जातेय
उगाच दडपणाखाली राहू नकोस
कसं होईल माझं
या चिंतेत गुदमरू नकोस.
कसं सांगू तुला?
झालं तुझं तसं माझं होईल
तुझ्या अतिचिंतेमुळे
माझी पंचाईत होईल
तुझ्या उदरात वाढलेली
लेक मी
कोंडी फोडायचे ज्ञान
आत्ताच लागलेय माझ्या हाती
अर्थात द्यावी लागली
तुला स्वत:ची आहुती
त्यात माझा दोष नाही
सॉरी, पण मनात असूनही
तुला गं मदत करता येत नाही
मार्ग दोघींनाही दिसतो
स्वत:च्या बचावाचा
मी तो स्वीकारला आणि तू?
जाणीवपूर्वक टाळला
गेलीस त्या मार्गाकडे
जिथे तू हरूनही जिंकणार होतीस
म्हणूनच गं तुझी काळजी वाटते
आम्हाला जगवताना तू
अखंड जळत असतेस

◆

## कठपुतळी

कारुण्याच्या झालरी घालताहेत वारा
माझ्यापासून खूप दूर
मी मात्र तहानलेली
कोरड्या विहिरीचा तळ खणीत
ठरवून टाकते कोणीतरी
गणित आपल्याच आयुष्याचे
मुंडावळ्यांचे फास वाचवत
ही नवरी बिचारी भेदरलेली
नव्याला जन्म देण्याची
ही लादली हौस कोणाची?
नाकारायची नाही हिम्मत
करतेय सहन ही कठपुतळी
मोडलेल्या कंबरड्यात
त्राण आणावे तरी कसे?
घाबरवून टाकते कांद्याच्या टरफलावरील
झुरळाचीही तडफड!
बदल हवा म्हणणारींचा आवाज बारीक
'करुच' चे आलाप गळघोटे
आणि बाराही महिने अविरत चालतो
हा 'मासूम चरखा' विस्कळीतपणे
◆



## एक घुसमटलेली खिडकी

एक घुसमटलेली खिडकी
पाहते आहे वाट
की...
अवचित कुठूनतरी येईल
एक निर्झर झरा
आणि बदलून टाकील
हे शापित आयुष्य.
तारेवरचा कावळाही
आवडून जातो
बुभुक्षित नजरांच्या
गजबजाटात
जिन्याची करकर,
पलंगाची कुईकुई,
सतत वाहणारी जखम,
शरीरातली वेदना का...
वेदनेतलं शरीर
हास्याच्या लकेरीत
जाता लोपून
मानवातील अस्थिपंजर
◆

## हे प्रिय...

तू म्हणत असशील तर
चंद्र-तारे आणून देते तुला मी
तू म्हणत असशील तर
'नदिया के पार' नेईन तुला मी
तू म्हणत असशील तर
सूर्य पश्चिमेला उगवला म्हणेन मी
नि रात्रीचा दिवस करीन मी
तू म्हणत असशील तर म्हणेन 'हो'
तू म्हणत असशील तरच म्हणेन 'नाही'
तू म्हणत असशील तर
आवडते होईल नावडते माझे
नि जीवनाच्या रंगात तुझ्या
सहज मिसळून जाईन मी
इतक्या अगतिकतेला
येऊन पोहोचले तरी...
तू म्हणत असशील तर
हेही विसरेन मी
पण तू यावंस...
तुला येण्यासाठी
रस्ते झाडून साफ केलेत
रात्रंदिवस हातातून रक्त येईपर्यंत
तुझ्यासाठी शाकारून ठेवलीय्

मखमली शय्या...
खास तुझ्या आवडीची
अत्तरदाणीत रातराणी भरलीय
माझे बोलणे तुझ्या कानावर
पडू नये म्हणून,
मी प्रश्नच मिटवून टाकलेत
तू येणार म्हणून
जर... तू असशील म्हणत,...
'प्रिये, मी येत आहे'
◆

## ... तर बरं झालं असतं

बरंचसं काही हरवून जातं
बरंचसं मिळविण्याच्या नादात
आणि चुकून-चुकून वाटून जातं
मी 'सॉरी' बोललो/बोलले असते
तर बरं झालं असतं.

बऱ्याचशा वेदनेची तोंडं
पूर्णपणे मोकळीही झाली नसतात
आतूनच बोलते मन
पाठ फिरविण्याआधीच
पकडला असता हात
तर बरं झालं असतं.

दोषी असेल कोण
काय फरक पडतो?
वस्तीपासून खूप दूर आहे
ही दलदलीची जागा
मी बुडतेय् म्हटल्यावर
काठावरच्यानं हात दिला असता
तर बरं झालं असतं...



जास्त विचार करणे
मुळात प्रकृतीच्या उलट आहे
तरी 'पॉझिटिव्ह-निगेटिव्ह'चे थिंकिंग
'व्हायरस' सारखे आयुष्यात
तुझे माझे तर सोडाच
किमान एकासारखे जरी
जगता आले असते
तर बरं झालं असतं

प्रेम तर होतच असतं
तुझ्या-माझ्या 'परमिशन'शिवाय
कधी झालं कळलंच नाही
हे जरा आधी समजलं असतं
तर बरं झालं असतं.

आयुष्याच्या या सांजवेळी
तुझं नि माझंच असतं जग
तर बरं झालं असतं.

## प्रियकर

माझा प्रियकर तू
माझा उन्माद तू
सळसळणाऱ्या तरुशाखा
झरझरणारा पाऊस तू
घनघोर नभातले ओथंबलेपण
गडगडणाऱ्या आवाजापरी
रसरसता शृंगार तू
वाहणाऱ्या नदीचा खळखळाट
चिंब भिजलेल्या युवतीची साद तू
हिरवेपणा ल्यालेल्या या वनराईची
हिरवाई तू
रात्री बरसणाऱ्या रातराणीचा सुवास तू
ओथंबलेल्या माझ्या मनातली
प्रीत तू
उगवतीच्या क्षितिजावर घुमणारा
मंदिरातला पवित्र घण्टानाद तू
पहा... पहा माझ्या या नजरेत
वखवखणाऱ्या या दुनियेतील
माझ्या प्रीतीची साक्ष तू
माझा प्रियकर तू
माझा प्रियकर तू

◆



## ही वाट वेगळी

लोक म्हणतात की
मला दु:खाचाच सोस आहे
पण त्यांना समजावं कसं की
सुखाच्या सावल्याही
आसपास नाहीत फिरकत
उलट्या दिशेने पळण्याच्या शर्यतीत
धावणं पसंत नाही मला
तर काय करू?
जीवनाच्या सत्यापासून
पळणंही जमत नाही मला
पहाटेचे दव बघितले असते सर्वांनी
पहिल्या थेंबाला प्यायचं आहे
सखी मला...
ओढली जातेय आपोआप
अंधाऱ्या कोपऱ्याकडे
हाती लागेल कोणी तर
उजेड पसरवायचाय त्यांच्या
जीवनात मला..
कोणी हसेल मला
खुशाल हसोत बापडे
ही वाट जी वेगळी दिसते
त्यावरच चालायचं आहे
हीच जिद्द आहे माझी

◆

## मेलेल्यांचे जग

सर्वांना चौकाचौकात खेचून
ढुंगणावर फटके द्यावेत
लालबुंद होईपर्यंत
मग मी हसेन मिश्किलपणे.
खेचावीत अलिशान घरांतून
माजलेली डुकरे
कापावीत उभी धरून
स्पेशल व्यासपीठावर
मी तोंड वळवून चालू लागेन
काहीच न घडल्यासारखी
हारांच्या जागी फाशीचे फंदे दिसू लागतात
हसणाऱ्या दातांतून लटकणाऱ्या जिभा
वेड तर नाही ना लागले ..
पण हेही मेंदू शाबूत असल्याचे लक्षण
मी चाललेय चूपचाप शांत
एखादा शेतकरी आत्महत्या करतो
सरकार नुकसानभरपाई देऊन मोकळे
मी आतून गलबलते
अजून पाणीही डोक्यावरून गेले नाही
अशी कळी बलात्कारित होते
तरीही हलत नाही मन
मी विस्कळीत होते

एखादा गुन्हेगार फाशी जातो
नि फटाके फोडले जातात
आनंदोत्सव साजरा केला जातो
मला त्यांचा परिवार दिसतो
डोळ्यातले पाणी लपवीत
त्यांच्या बलिदानामुळे मिळालेला
भाकरतुकडा गिळीत पण...
मोकळे फिरतात कावेबाज
मी आतून शतश: विदीर्ण
मेलेल्यांच्या जगात प्रेतवत
◆

## जाऊ दे होऊनच एकदाचं

जाऊ दे होऊनच एकदाचं
आरपार ...
माझ्यातील पशूला
जागे करून मारल्याशिवाय
नाही गत्यंतर ..
घेईल एकतर घोट नरडीचा
कोणाच्यातरी...
किंवा माझा तरी
अवघड आहे असे जगणे
रोजच्या अशा जगण्यापेक्षा
एक पाऊल पुढे किंवा मागे तरी !!
एकाच शरीरातील गर्दी
श्वेतपेटीत कोंबून भरलेल्या
प्रेतांसारखी...
आजच्या तिथीला ..आजच्या तारखेला ...
समयानुसार हे असेही आत्मदहन
माझ्याच साक्षीने !!
भेट उद्या नव्याने
नव्या ओळखीने
संदर्भ जुने पुसून...!

◆

## मी आणि माझे अनुभव



माझ्या अवती भवती घडणाऱ्या घटना
मला खूप त्रस्त करतात
माझं दैनंदिन जगणं
खूप असह्य करुन टाकतात
मला चीड येते पण,
मी व्यक्त करू शकत नाही.
मला रडावेसे वाटते पण,
मी रडू शकत नाही.
मला भीतीही वाटते पण,
मी दाखवू शकत नाही.
आणि तटस्थ राहण्याची कला
अजून तरी साधलेली नाही.
एकाच वेळी 'मी' जगभर असते
सातत्याने कुठे ना कुठे तरी
अत्याचारित होत असते!
माझे शरीर, असे विखुरलेले आहे
पण त्या टोकाची वेदना
तितक्याच तीव्रतेने ह्या टोकाला
येऊन भिडते.
माझे अनुभव भीषण, भयानक आहेत
पण..
माझ्या वाट्याला आलाय
मात्र एक टक्का!

◆

## एक शाखा इकडेही


सरकारी यंत्रणेच्या बुडाला पलिते लावावेत
गरमागरम खुर्चीवर बसून उबवलेत साले
ह्यांनी काढलेली पिल्ले सोकावून
घरभर नाचताहेत
उच्छाद मांडलाय कार्ट्यांनी
हरामखोरांचे बाप पंख पसरवून
सुरक्षितता पुरवताहेत ह्यांना
ह्यांची नजर इतकी निर्ढावलीय
कोवळा अंकुरही पाठून पुढून
वरून खालून अगदी जवळून
खोदून-खोदून पाहताहेत
तिच्याच जन्मदात्रीसमोर
बिचारी समजत नाही की समजून गपचीप
गरिबीच्या आयला लावला...
नजरेने काय किंवा डायरेक्ट काय
ह्यांच्या प्लेटा नेहमीच तयार असतात
उघड्यावरचे संसार तुमच्या सोयीसाठीच भडव्यांनो
आम्हीही साले, घरचे काय म्हणतील
समाज काय म्हणेल, चे नन्नाचे पाढे वाचत
आम्हालाही काही कळले नाही म्हणून
सराईत हसू फेकून मोकळे
आत कशाला खदखदताय

तुमची आई–बहीण गोंजारायला लागल्यावर
आवाज काढला की बदल होतो म्हणे ?
शिळ्या कढीला ऊत फार
ताजे खायची आम्हाला सवय नाही
द्यायची त्यांना नाही
आचारी ते, वाढपी ते
गिळतोय मस्त जहर
चवदार – चवदार
आमट्यांनु, तुमचा विस्तार वाढवा
एक शाखा इकडेही
◆

## जाऊन येते परमेश्वराच्या मार्केटमध्ये

माणसं माणसाला आवडेनाशी झाली तर...
श्वापदांनी खुशाल यावं घरात
नि राज्य करावं या प्रजेवर
उरलेल्यांना डांबून ठेवावं तुमच्या भटारखान्यात
भूक लागेल तेव्हा खाण्यासाठी
लांडीलबाडी करू लागले की
हडळींनो ..भुतांनो ..स्मशान सोडून
खुशाल या इथे नांदायला
तुम्हाला खाण्यासाठी इथे बक्कळ पोसलंय
मदिरेत मुरवलेलं ..आरामदायी गुबगुबलेलं
रक्त-मांस पुरवून पुरवून खाल तुम्ही
एव्हढी आरामदायी, कुंदकळी घरं कदाचित
आवडणार नाहीत तुम्हाला
मी देते हातोडा मजबूत
त्यांना स्मशान बनवण्यासाठी
आयाबहिणींना जाऊ द्या
ती करतील उभे नवे जग
प्रसवून प्रसवून तड लागेपर्यंत !!
तुमच्या पुढील पिढीच्या सोयीसाठी तय्यार
नाहीच जमलं तुम्हाला तर
साफसूफ करून बांधून ठेवा नोहाची होडी
मी जाऊन येते तोवर
परमेश्वराच्या मार्केटमध्ये
काही मदत मिळतेय का पाहून !!!!

◆



## कवी

जुन्या चिठ्ठ्याचपाट्यांचे महत्त्व
आम्हा कवींना विचारा
अधाशासारखे भरत जातो
रिकाम्या जागा निवडक शब्दांनी

दोन शब्दांच्या मधली फट
जास्तच लांबत जाते तेव्हा
एखादा आलाप आमचा
सुसह्य करून टाकतो सर्व

एकसंध वाटणाऱ्या या आयुष्याचे
विखुरलेले अंतर्गत तुकडे
जोडून टाकतो
विरह वा प्रेमगीताने

बनतो आम्ही बघा
रात्र आणि दिवसाला जोडणारा
शाश्वत दुवा!!

◆

## त्या वळणावर

भेटू पुन्हा कधी
त्या वळणावर
एका हुरहुरीची कथा
लिहू पुन्हा कोऱ्या पानावर

नजरेला नजर मिळविण्याचे
धाडसही नव्हते कधी
येऊ पुन्हा कधी त्या
अनोळख्या वळणावर

तुझ्या श्वासाची लयही
जाणवायची कधी बेधुंदपणे
अनुभवू ती अनिवारता
त्या रोमांचक वळणावर

नजरेचा लपंडाव
होता मोठा भारी तो
अलगद फुटे हसू
त्या खट्याळ वळणावर

बरेच आलो पुढे
सापडत नाही आपणच आपल्याला
फिरून एकदा होऊ हळुवार
आपल्यासाठी त्या वळणावर
◆

## कविता

कागदावर टिकते
कागदालाही चिरते
वेदनेचा घेऊन लोळ
मनालाही जखमी करते

शाब्दिक चिथड्या चिळकांडणाऱ्या
माझ्याही अन् तुमच्याही
मनाचा कोंडमारा खुला करत
इथे जरा विसावा घेते

भांबावलेल्या जगाला सोडत मागे
संस्कृतीचे तांडव करते
पार चिरत,चिरफळ्या करत
आपल्यालाच आरसा दाखवते

होऊ नये जगात तरी
उलथापालथ ही होतच असते
कवितेच्या मूठभर ओळीत
आयुष्याचे सार सामावलेले असते

मस्तीत कधी बेधुंदपणे
व्याकुळतेने रडू लागते
मला जेव्हा गरज असते खरी
तेव्हा माझ्या वेदनेचा ती श्वास होते
◆

## टेक इट ईझी

चिकटवलेल्या धडावर
दोन हात व पाय असतात
डोकं नावाच्या वस्तूवर
ढीगभर फक्त केस असतात
मेंदूचे फक्त दोन काप
कलिंगडाच्या फोडीगत
डावा शहाणा उजवा कमी
बोंबलतात मानसोपचार लोक
तरी लागते भूक रोज
पोटाची, मनाची, शरीराचीही
कमरेखालचा लकवा अन्
पोलिओग्रस्त जुळ्यांची निर्मिती
रोजच वाहतात नाले
दुर्गधीने भरभरून जमिनीखालून ,
उंच इमारतीच्या पाईपातून
फिनेल ओतून, ओडोनील लावून
रिचवतात चकण्यासोबत
मद्याचे प्यालेच्या प्याले
ईझी नसतं काही
टेक इट ईझी म्हटलं तरी
चावऱ्या मुंग्यांची रांग मोडून
नसते फंदात पडायचे कधी

◆



## माय म्हंते...

थान ओढून ओढून
थकलेल्या प्वाराला
माय म्हंते...
जोर लाव की रं पोरा
निघंल... निघंल...
दूध निघंल....
मी जगतेय नव्हं का ?
मंग ते बी निघंल..
तेही बिचारं
हात पाय मारून ओढतंय
दूध समजून घाम पीत
तृप्त होतंय !!
न ओढून सांगतंय कुणाला?
आकांत मांडायला
फुफ्फुसेही पुष्ट हवीत ना !!
◆

## जग तेव्हाचे नाही सुषमा

मेल्यानंतर ठीक होते
कशाला खेचलेत या जंजाळात
प्रेमाची अनुभूती नव-निर्मितीसाठी
तुमचा ध्यास न माझा त्रास !

इतका पसारा वाढवून ठेवलाय
संकुचितलेली प्रत्येक दृष्टी
झापड बांधून घोड्यासारखे
आम्ही आमच्यातच मग्न

त्यांच्यापेक्षा थोडं सुखी अधिक
अटीतटीला आलाय
जन जन जणू
माझ्या तुमच्यातील दरीचा
झुलता बांध कमजोरलेला

मी लाख म्हणेन सुधारण्याचा
ठेका द्यावा माझ्या हाती
माझे वाटणे माझ्यापुरतेच
घाबरवून टाकतात अंधारातून
अनेक डोळे पिसाळलेले

कधी वाटते जावेसे
गौतमापाठी गौतमी बनून
जग तेव्हाचे नाही सुषमा
गुरूंची जमात आंदोलनातील एकसाथ
◆

## मला बघून...

मला बघून...
मला बघून एकाचवेळी
कोणाला माझ्याबद्दल
प्रेम वाटू लागतं,
कोणाला कणव ,
कोणाला मत्सर,
कोणाला घृणा.. किळस..
तर कोणाला माझे अस्तित्वही नकोसे
कोणाला माझ्या
असण्या-नसण्यानेही फरक नाही पडत
तर कोणाला सेकंदभर दूर जाणेही
ठेवते तळमळत
कोणी म्हणे तू म्हणजे तू
तर कोणी 'ओह शिट'
दु:ख व्हायच्या ऐवजी
सुखाने मी का म्हणू नये ,
'मी आहे परिपूर्ण '!!!
◆

## जायचेच आहे तर...

कितीही म्हटले तरी
पुसता येत नाहीत
स्मृतीच्या लहरी
खोदून ठेवतात
पुढे जाऊन कबरी
अधिकच खोलवर
कदाचित येत असतो
काळ जवळ म्हणून ....
सुचते हे शहाणपण !!
दरवाजे बंद होण्याआधीच
असतो प्रवेश निश्चित!!
जावे तिथे शिक्के
मारायचे ठरलेलेच !!
तरी पण.....
स्वत:च्याच नाळेला पकडून
परतीचा प्रवास
पाहावा एकदा ..
यायचेच आहे ,
जायचेच आहे तर !!

◆

## म्हणे सुषमा,
## ‘काय योजिले पाठवून?’

कोटी कोटी म्हणे देवांची गर्दी
तरी भीती का ही चारी ठाव?
म्हणे देऊ कासेची लंगोटी तरी
बळी पडते कौमार्य का भर बाजारी ?
येतो नागवा, जातोही नागवा
कफनाचा हा अट्टाहास कोणासाठी ?
असे अमर, असा न जगी झाला
पुतळ्यारूपी उरून का गुन्हा केला?
होते भल्यासाठीच, झाले भल्यासाठीच
अत्याचाराचे दार खुले कोणी केले?
जीवन हे वाटे पदोपदी मृत्यूचा सापळा
ठेविले तैसे राहावे का म्हणून?
तीच ती धरा, तीच ती वृक्षवल्ली
रडावया खांदा असा योग्य का नाही?
कोण्या दुष्टाने हे स्वप्न का पाहिलेले
का मिठीत माझ्या रडे वसुंधरा ही?
म्हणे सुषमा ‘काय योजिले पाठवून?’
चिंतनाच्या अंगणी झाला जीव गोळा.

◆

## पाऊस

आकाशाचा झालाय फळा
मन झालंय खडू
ढगांच्या अवखळ आकारात
रंग लागलंय भरू

चारी कोनातून एकत्र येतात
पुन्हा दाही दिशांना धावतात
आत्म्याशी तादात्म्य पावत
हितगुज करू लागतात

वाटतं कोण्या देशाहून एक
आलाय राजकुमार स्वप्ने घेऊन
स्वागत कराया मी सजले
लाजरी नववधू होऊन

हां हां म्हणता बरसतो कान्हा
बासुरीच्या मधुर सुरात
या वेड्या राधेची पाऊले
नाचू लागती खळाळत्या जळात

◆



# मराठी अमृतभाषा आहे.

मराठी ही अमृतवाणी आहे. खुद्द ज्ञानोबामाऊलींनी सांगितलंय.

ज्यांना ज्यांना मराठीचं पुढे काय होणार याची चिंता लागलीय त्यांना चोख उत्तर द्यायला नवीन पिढीतले हजारो लोक इंटरनेटवर मराठी साहित्य उपलब्ध करून देण्याचं काम करत असतात. त्यातले आम्ही एक. आम्ही मिडियम निवडलंय ई मेल्सचं. आणि आज आमच्या प्रत्येक पुस्तकाची ई मेल दिड लाख लोकांना जाते. ही फ़ार मोठी संख्या आहे का? अजिबात नाही. बारा कोटी मराठी माणसांच्या, साताठ कोटी साक्षर मराठी माणसांच्या मानाने ही संख्या अगदीच नगण्य आहे. तुम्हाला नाही असं वाटत?

आमचं स्वप्न असायला हवं प्रत्येक मराठी माणसापर्यंत पुस्तक नेण्याचं. उत्तमातलं उत्तम साहित्य. जागतिक दर्जाचं. तेही विनामूल्य.

अशक्य आहे?

तुम्ही थोडीशी मदत कराल तर हे अजिबात अशक्य नाही.

पैसे नकोत हो. देणगी जाहिरात वगैरे अजिबात नको.

फ़क्त तुमच्या ओळखीच्या एक दोन चार दहा बारा वीस पन्नास शंभर लोकांचे आयडी द्या बरं. esahity@gmail.com या मेल आयडीला ते पाठवा. तुमचे सुशिक्षित नातेवाईक, मित्र, सहकारी, बॉस, सहप्रवासी. कोणाच्याही. प्रत्येक मराठी माणसाच्या आवडीचं आम्ही काही ना काही देतच असतो. तेही विनामूल्य. तेही उत्तम क्वालिटी.

फ़क्त एवढंच करा तर खरं भिडू. आणि मग आपण भिडूया त्या इंग्रजीच्या महासत्तेला. अशक्य वाटतंय?

या महाराष्ट्रात अनेक अशक्य घटना सक्य झाल्या आहेत भिडू.

तेव्हा या वर्षात बारा लाख वाचकांचा पल्ला गाठायचा म्हणजे गाठायचाच.

कराल ना एवढं?

करायला गेलं तर अशक्य काहीच नसतं हो!

टीम ई साहित्य प्रतिष्ठान